bhavishyavani भविष्यवाणी

bhavishya ALLIANCE

भविष्य अलायन्सचे मासिक बातमीपत्रक                                                                                    जून – जुलै २००९

अंतरंग –

- गर्ल्स गेनिंग ग्राऊंड - दुसऱ्या टप्प्यास सुरुवात
- नवापूर, नंदूरबार मधील ‘हात धुणे’ प्रकल्पाचा प्रभाव – एकात्मिक बाल विकास यंत्रणेच्या पर्यवेक्षकांमार्फत परीक्षण
- एकात्मिक बाल विकास सेवा योजना आणि एम आर इ.जी.ए च्या देयक देण्याच्या पध्दतीत सुधारणा
- बांधकाम प्रकल्पावरील डे केअर सेंटर सोबत अंगणवाडी कार्यकर्तीचेअनुभव कथन.

## आजपर्यंत

### गर्ल्स गेनिंग ग्राऊंड (घेऊ भरारी) - दुसऱ्या टप्प्यास सुरुवात :-

घेऊ भरारी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यास प्रेरकांच्या निवडीने गडचिरोली जिल्हयात, सुरुवात करण्यात आली. सप्टेंबर २००९ च्या मध्यापर्यंत सर्व तालुक्यातील प्रक्रिया पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

पहिल्या टप्प्यातील अनुभवांवरुन दुसऱ्या टप्प्याच्या प्रशिक्षणांच्या प्रक्रियेत थोडा बदल करण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात करण्यात आलेल्या प्रशिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमातून, एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पाठवायच्या संदेशाची होणारी गळती टाळण्यासाठी हया दुसऱ्या टप्प्यात ‘मिडीया मॅटर्स ’संस्थेमार्फत प्रेरकांनाच प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात येत आहे. सहा प्रशिक्षण सत्रांमधून तीस प्रेरकांचा एक गट, अशा जवळपास १८० प्रेरकांना प्रशिक्षण दिले जाईल. पहिल्या टप्प्यात प्रशिक्षण मिळालेले समन्वयक व सहाय्यक समन्वयकदेखील प्रेरक प्रशिक्षणासाठी हजर रहातील . तीस प्रेरकांच्या पहिल्या गटाच्या प्रशिक्षणास २५ सप्टेंबर २००९ रोजी सुरुवात होईल. ऑक्टोबर २००९ च्या मध्यापर्यंत सर्व प्रेरकांचे प्रशिक्षण संपेल.

हया प्रकल्पातील जीवन कौशल्य सहाय्य कार्यक्रमासोबत, भविष्य अलायन्स, किशोरवयीन मुलींच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी, नवीन व्यवसायाची सुरुवात करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी, ‘ॲन्टस् ॲण्ड पार्टनर्स’ सोबत भागीदारी करीत आहे. ‘ॲन्टस् ॲण्ड पार्टनर्स’च्या टीमने आजपर्यंत नासिक, गडचिरोली, अमरावती, ठाणे आणि मुंबई हया पाच जिल्हयातील संबंधित तालुक्यांना भेट दिली आहे आणि मुलींच्या गरजा व आशा आकांक्षा समजून घेण्यासाठी तसेच व्यवसायासाठी आवश्यक कौशल्य आणि घ्यायचे तांत्रिक ज्ञान याची माहिती घेण्यासाठी ८६३ जणांच्या मुलाखती घेतल्या आहेत. मिळवलेल्या माहितीवर आधारित करायच्या कामाची एक प्राथमिक संरचना त्यांनी तयार केली असून, भविष्य अलायन्सच्या भागीदार संस्थांबरोबर चर्चा करुन तिला लवकरच अंतिम स्वरुप दिले जाईल.

### न्यूयॉर्क युनिव्हर्सिटीच्या कॅप्स्टन विद्यार्थिनींमार्फत जीजीजी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे परीक्षण:-

भविष्य अलायन्सच्या विनंतीवरुन, न्यूयॉर्क युनिव्हर्सिटीच्या रॉबर्ट एफ वॅग्नर ग्रॅज्युएट स्कूल ऑफ पब्लिक सर्व्हिस, कॅप्स्टन प्रोग्रॅममधील पाच ग्रॅज्युएट विद्यार्थिनी – ॲम्बर बेकर, एमिली गोल्डमन् , मुत्सुमी नाकागामी, तारा नरोन्हा आणि कॅथरीन पोटस्की यांनी मुंबई, नासिक आणि ठाणे जिल्हयातील प्रकल्प क्षेत्रात ८ जुलै ते २३ जुलै या कालावधीत संशोधन प्रकल्प पार पाडला. जीजीजी प्रकल्पाचा किशोरवयीन मुलींवर पडलेला प्रभाव समजून घेण्यासाठी आणि एकंदरीत सामाजिक विकास विशेषत: आरोग्य व पोषणाचे प्रश्न समजून घेण्यासाठी त्यांनी विविध संबंधितांशी बोलणी केली.



घाटकोपर, मुंबईच्या किशोरवयीन मुलींच्या कार्यक्रमातील प्रेरिकांशी बोलताना न्यूयॉर्क युनिव्हर्सिटीतील विद्यार्थिनी

हया संशोधन प्रकल्पात हया विद्यार्थीनींनी जीजीजी प्रकल्पाचे संस्थांमधील समन्वयक (वचन , स्नेहा, बायफ आणि आरोहण संस्था) आरोग्य केंद्र, प्रेरिका, जीजीजी मुलींचे पालक, अंगणवाडी कार्यकर्त्या, आश्रमशाळा, एकात्मिक आदिवासी विकास कार्यक्रम आणि एकात्मिक बाल विकास सेवायोजनेचे शासकीय कर्मचारी यांचेसोबत चर्चा केली. प्रकल्पक्षेत्रातील मुलींच्या सत्रांनाही त्या हजर राहिल्या. नोव्हेंबर २००९ मध्ये त्यांचा संपूर्ण अहवाल भविष्य अलायन्सला, त्या सादर करतील.

<u>प्राथमिक अहवालात त्यांनी सादर केलेले यशस्वितेचे मुद्दे पुढीलप्रमाणे :-</u>

- मासिकपाळी आणि प्रजनन याबाबत अधिक जागृती झाल्याबाबत सर्वच मुलींनी सांगितले .
- आपापल्या वस्तीत / गावात सहभागितांनी वैयक्तिक अथवा सामुहिक कृतीकार्यक्रम पार पाडले. (अधिक तपशील खाली दिला आहे.)
- प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत, ग्रामसभा , अंगणवाडी केंद्र आणि स्वयंसहायता गट हयासारखा उपलब्ध शासकीय यंत्रणांविषयी मुलींमध्ये अधिक जागरुकता आढळून आली.
- स्वत:च्या भविष्यासाठी (उदा. वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यावर लग्न, व्यवसायाचे पर्याय इ.) उपलब्ध पर्याय याबात मुलींनी अधिक जागृती दाखवली.
- शिक्षण चालू ठेवण्याबाबत मुलींनी इच्छा व्यक्त केली.
- वैयक्तिक स्वच्छता आणि स्वत:च्या पोषणाबाबत त्यांची स्वत:ची जबाबदारी यामध्ये मुलींनी अधिक रस घेतल्याचे आढळले.
- गर्ल्स गेनिंग ग्राऊंड अभ्यासक्रमातील माहिती सहभागी मुलींनी आणि प्रेरिकांनी आपापल्या कुटुंबियांना आणि आपल्या वस्तीला / गावाला दिलेली आढळली.
- वैयक्तिक निवडीचे पर्याय, निर्णयक्षमता, अधिक माहिती आणि समाजामध्ये उंचावलेले स्थान याबाबत जाणीवजागृती व सक्षमीकरण याबाबत प्रेरकांनी आपली जाण विकसित झाल्याचे नमूद केले.
- आपल्या मित्रमैत्रिणी , कुटुंब, वस्ती / गाव आणि शासन यांचेसमवेत संवाद कौशल्यात झालेली सुधारणा
- आपल्या बरोबरच्या व्यक्तींसमवेत चर्चा करण्यासाठी व संवाद साधण्यासाठी जीजीजी सत्रे हया मुलींसाठी एक सुखदायक जागा बनली आहे.

<u>या सोबत प्रकल्पातील अडचणी त्यांनी पुढीलप्रमाणे नमूद केल्या :-</u>

- मिटींगसाठी पुरशी जागा उपलब्ध होण्यात अडचणी(जागा न मिळणे , वीज नसणे, सदोष बांधकाम)
- मुलींना विशेषत: ग्रामीण भागातील मुलींना, मोकळा वेळ मिळत नाही त्यामुळे सत्रांना अनियमित हजेरी असते.
- प्रेरक आणि सहभागींनी अभ्यासक्रमातील काही भाग नीट समजला नाही आणि त्यांच्या आयुष्याशी त्या भागाचा काय संबंध आहे, हे समजले नाही, असे नमूद केले.
- मुलींच्या नियमित हजेरीसाठी पालकांचा सहभाग आवश्यक ठरतो पण तो मिळणे कठीण असू शकते.
- काही प्रेरकांचा कार्यक्रमातील सहभाग संपुष्टात येणे, नवीन नेमणुका आणि प्रेरकांचे नियमित प्रशिक्षण यामुळे कार्यक्रमातील सातत्य टिकून रहात नाही.
- साक्षरता आणि शिक्षणाचा खालचा स्तर यामुळे अभ्यासक्रम समजण्यात अडथळे येतात.

**हात धुणे :- एकात्मिक बालविकास यंत्रणेतील पर्यवेक्षिकांमार्फत नवापूर, नंदूरबार येथील प्रकल्पाच्या प्रभावाचे परीक्षण**



हात धुण्यासंबंधी योग्य वागणूक नंदूरबारच्या गावामध्ये खेळाद्वारे समजावून सांगताना

नंदुरबार जिल्हयातील १४३ गावांमधील सूक्ष्म नियोजनात हात धुणे या बाबीचा समावेश पूर्ण होत असतानाच, नवापूर तालुक्यातील २९ नवीन गावांमध्ये सूक्ष्म नियोजन प्रक्रिया सुरु होत आहे.नवापूरमधील पाडसून व डोगेगाव ग्रामपंचायतीतील १५ गावांमध्ये हात धुणे प्रकल्पाचा प्रभाव पडताळून बघण्यासाठी प्रकल्पाच्या सुरुवातीला आणि प्रकल्पाच्या शेवटी, एकात्मिक बाल विकास यंत्रणेच्या पर्यवेक्षिकांकडून , एम.एस.डब्ल्यूच्या विद्यार्थ्यांमार्फत, मूल्यमापन सुरु आहे. हा अभ्यास ऑगस्ट २००९ अखेरपर्यंत पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे. पुढच्या काही महिन्यांत ३३० गावांमधील चार लाख मुले, स्त्रिया आणि इतर कुटुंबियांपर्यंत हा कार्यक्रम पोहोचेल . हिंदुस्थान युनिलिव्हरच्या स्वास्थ्य चेतना कार्यक्रमात युनिसेफचे काही नवीन मुद्दे अंतर्भूत करुन वर्तणूक बदल संवाद प्रक्रिया राबविण्यात येत आहे. गाव / वस्तीमधे हया प्रक्रियेला चांगला प्रतिसाद लाभतो आहे.

**एकात्मिक बाल विकास यंत्रणा एम.आर.इ.जी.ए कार्यक्रमातील देयके देण्याच्या पध्दतीत सुधारणा :-**

स्वयंसहायता गट, अंगणवाडी कार्यकर्त्या व सहायिका यांचे अनुदान मिळण्यातील प्रशासकीय दिरंगाई (उशीर) कमी करण्याच्या दृष्टीने काही महिन्यांपूर्वी एका प्रकल्पाचे नियोजन झाले होते. त्याबाबत व अंगणवाडी केंद्राचे कामकाज सुधारण्याबाबत एक पाऊल पुढे टाकले गेले आहे. अंमलबजावणीची उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टीने एम्.आर.इ.जी. ए च्या सहभागी सदस्यांनाही अनुदान देण्यात सहभागी करुन घेण्याचे ठरविण्यात आले आहे. मेळघाट, अमरावती मध्ये , फिनो(फायनॅन्शियल इन्फर्मेशन ॲण्ड नेटवर्क ऑपरेशन्स लिमिटेड), एकात्मिक बाल विकास यंत्रणा आणि एम.आर.ई.जी. ए. यांच्या भागीदारीतून आय एफ एम आर ट्रस्टच्या आर्थिक सहकार्याने हा प्रकल्प राबविला जाईल स्थानिक बॅंकेसोबत फिनो, सहभागितांना बायोमेट्रिक स्मार्ट कार्ड देण्यास एकात्मिक बाल विकास यंत्रणेला मदत करेल. एकात्मिक बाल विकास यंत्रणेकडून सूचना मिळाल्यास सहभागितांना ताबडतोब देयके दिली जातील. हया पध्दतीमुळे अनुदान मिळण्यास होणारा उशीर टाळता येईल आणि प्रकल्पक्षेत्रातील अंगणवाडी केंद्रांची कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल.

जुलै २००९ मध्ये अमरावतीला फिनो, एकात्मिक बाल विकास यंत्रणा, एम.आर.इ.जी.ए.आणि भविष्य अलायन्स प्रतिनिधी यांची हयाबाबत एक प्राथमिक बैठक पार पाडली.

धारणी तालुक्यातील पाच ग्रामपंचायतींमधून हया प्रकल्पाची सुरुवात केली जाईल. एकात्मिक बाल विकास यंत्रणा व एम आर ई जी ए हया दोन्ही संस्था फिनोबरोबर भागीदारी करतील . हयाबाबतचा शासकीय आदेश एकात्मिक बाल विकास यंत्रणेमार्फत जाहीर करण्यात आला असून, पुढची वाटचाल करण्यासाठी एम.आर.इ.जी ए.कडून अशा आदेशाची प्रतीक्षा केली जात आहे.

**बांधकाम प्रकल्पातील डे केअर सेंटर – एकात्मिक बाल विकास सेवायोजनेच्या अंगणवाडी केंद्रातील वर्षा पाथरे यांचे डे केअर सेंटर मध्ये अनुभव कथन :-**



वर्षा पाथरे गेली दहा वर्षे एकात्मिक बाल विकास यंत्रणेच्या अंगणवाडी कार्यकर्ती म्हणून काम करतात, एकात्मिक बाल विकास यंत्रणा, मुंबई मोबाईल क्रेशेस, निर्माण, बी.जी.शिर्के – बांधकाम व्यावसायिक व भविष्य अलायन्स यांच्या भागीदारीतून सुरु झालेल्या प्रतीक्षानगर येथील अंगणवाडी तथा डे केअर सेंटरमध्ये त्या आता काम बघतात.

त्या एक सामाजिक कार्यकर्त्या आहेत. डे केअर केंद्रामार्फत बांधकाम प्रकल्पावरील मुलांसाठी जे काम केले जाते त्यामुळे हया एकंदरीत दुर्लक्षित असलेल्या मुलांमध्ये चांगला फरक पडतो आहे, असे त्यांना वाटते . वापरले जाणारे शैक्षणिक साहित्य , शिकवण्याच्या पध्दती, पूर्ण दिवसभर मुलांवर ठेवले जाणारे लक्ष, त्यांच्या वजनावर ठेवले जाणारे लक्ष,

पोषण, खाऊ, जीवनसत्त्व पुरवठा इ. गोष्टी, मुलांची वाढ आणि विकासासाठी महत्त्वाच्या ठरतात. अन्यथा ही मुले नुसतीच कुठेतरी अस्वच्छ व धोकादायक परिसरात खेळत राहिली असती किंवा घरी त्यांच्या मोठया भावंडांबरोबर सोडून दिली गेली असती. मुंबई मोबाईल क्रेशेसच्या प्रशिक्षण व पाठपुराव्यामुळे त्यांचे शिकवण्याचे कौशल्य सुधारले आहे, असे त्या सांगतात. बांधकाम व्यावसायिक बी.जी.शिर्के यांनी केंद्रासाठी दिलेल्या ऐसपैस जागेमुळे मुलांच्या विकासासाठी आवश्यक असा संवाद साधणे सोपे जाते.

याचबरोबर बांधकाम प्रकल्पावरील गरोदर व स्तनदा मातांनाही स्वयंसहायता गटांमार्फत मुलांसाठी तयार केलेला पूरक आहार दिला जातो. मुलांसाठी अशी अनेक केंद्रे सुरु व्हावीत असे मला वाटते.

---------------------********* ---------------------

तुम्हाला जर कोणत्याही सूचना, प्रतिसाद किंवा सहभाग द्यायचा असेल तर संगीता दासमोहपात्र यांना लिहा:- sangeeta@bhavishyaalliance.org.in / sangeetadm@yahoo.com, भविष्य अलायन्स, प्लॉट नं.१३१, जे लेन, सागर विहार जवळ, वाशी,नवी मुंबई - ४०० ७०३.फोन: ९१-२२-२७८२३२०२ / २७८२१६५७ फॅक्स : ९१-२२–२७८२४६२९